**गोव्यातील पर्यटनांचे बहुआयाम**

**श्री. रणजीत कुंभार** ग्रंथालय परिचर , कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज

---

गोमंतक भूमी म्हणजे गोवा त्याला श्रेष्ठ कवी बा. भ. बोरकर यांनी देवभूमी म्हटले आहे.

अशी गोव्याला विगवेगळी नावे आहे गोवा म्हणजे निसर्गाला पडलेले एक सुंदर स्वप्नच आहे. या भूमीत निसर्गाने मुक्त हस्ते उधळण केली आहे. ही भूमी सौंदर्याने इतकी नटलेली आहे की यांचे आकर्षण भारतीय बरोबरच परदेशी विदेशी लोकांना आहे यातील समुद्र नद्या हिरवेगार डोंगर कपारीतून दाट जंगलातून वेडी वाकडे वळणे घेत खेडे गावात जाणा-या अरुंद रस्त्याने प्रवास करताना अल्हाददायी निसर्ग मन उत्साही करतो अशा अनेक गोष्टी पर्यटकांना आकर्षित करतात या ठिकाणी सागरी क्रीडा प्रकार जलसफारी या विदेशी पर्यटकांना खास आकर्षित करतात. त्याला समुद्रातील साहसी पर्यटन असेही म्हणतात या साहसी पर्यटनामध्ये जल क्रीडा प्रकार हा एक विकसित झाला आहे गोव्याला 110 किलोमीटरचा समुद्र किनारा लाभला आहे आणि हाच सागरी पर्यटन व जल क्रीडा प्रकार यासाठी पर्यटकांना आकर्षित करण्याचा केंद्रबिंदू आहे यासाठी गोवा सरकारच्या गोवा पर्यटन खात्याने विविध जल क्रीडा प्रकार उपलब्ध करून दिलेले आहेत.

जल क्रीडा प्रकारात सर्किंग बोर्गी बोर्डिंग स्कनॉर्कलिंग स्किईग सर्फींग ड्रायविंग जेट स्किन विंग तसेच खोल समुद्रातील मासेमारी हया क्रीडा प्रकारांचा मनमुराद आनंद लुटता येतो व मन अगदी डुंबून जाते आणि हा आनंद पुन्हा पुन्हा घेण्यासाठी मन बेचैन राहते कोणत्याही समुद्रकिनारी जलक्रीडा करू इच्छिणाऱ्याजवळ एकमेव पात्रता असावी लागते ते म्हणजे आत्मविश्वास व धाडस हे ज्यांच्याकडे आहे तो म्हणजे समुद्रावरती स्वार होऊ शकतो बोगमोळा समुद्रकिनाऱ्यावर स्कुयाबा डायव्हिंग किंवा पॅरॅसेलिंग अनुभवता येते जल क्रीडा प्रकाराचा आनंद ऑक्टोंबर ते मी या काळात लुटता येतो गोव्याच्या वेगवेगळया भागात तेथील भौगोलिक रचनेनुसार जलसफारीचे आयोजन केले जाते यात प्रेमी युगासाठी सूर्यास्त किंवा चांदण्याचा आनंद लुटणाऱ्या इच्छिणाऱ्यांनी धाडस व साहस करू इच्छिणाऱ्यासाठी तसेच मगरी सुसर पाण्याची तीव्र इच्छा असणाऱ्याने जलसफारीचा आनंद घेणे क्रमप्राप्त आहे.पणजीला लागून असलेल्या मांडवी नदीच्या किनारी डॉक्टर सलीम अली पक्षी अभयारण्य आहे येथे जलसफर करताना मसाले पिकांचा सुगंध एक विलक्षण अनुभव देतो.

मये मध्ये जलाशय पणजी पासून 35 किलोमीटर सर्वात मोठा जलाशय आहे. तेथे जलाशय आदर्श सहलीसाठी हे ठिकाण आहे हिरव्यागार डोंगराच्या सानिध्यात जलाशयाला शंख स्वच्छ निळयाभोर पाण्यात पर्यटकांना सॅडल बोटीतून सफर करता येते जलाशयाचा भाग हा ग्रामीण भागात असला तरी पर्यटकांना राहण्यासाठी झोपड्या आहेत पर्यटकांचे आदरा तिथे व गावची खडा खडा माहिती देण्यात येथील ग्रामीण लोक नेहमी तत्पर असतात तसेच गोवा सरकार राज्यातील पर्यटका पूरक आणि निसर्गधारित पर्यटनाला अधिक बळ देण्यासाठी नव्या धोरणात्मक चौकटीवर काम करत आहे गोवा पर्यटन विकास आणि गोवा पर्यटन विकास मंडळ राज्यभर पर्यटन विभाग पर्यटन उपक्रमांना सक्रिय प्रस्ताहन देत आहे या उपक्रमामुळे पर्यटकांना गोव्याच्या समुद्रकिनाऱ्या पलीकडे जाऊन निसर्गाचा अनुभव घेता येईल तसेच जबाबदार पर्यटन पद्धती आणि पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळणार आहे नुकत्याच विधानसभेच्या अधिवेशनात या संदर्भात माहिती देताना गोव्याचे पर्यटन मंत्री रोहन खंवटे यांनी या उपक्रमांचा भाग म्हणून जीटीडीसी ने केला गावात पर्यटन पूरक निवासस्थाने उभारले आहेत पर्यटकांसाठी जीपद्वारे जंगल सफारी पायी भटकंती मार्ग अशा निसर्ग पर्यटनांची आणखी करत आहेत दूध सागर वॉटर फॉल येथे आयोजित भटकंतीमुळे पर्यटकांना गोव्यातील वन्यजीव आणि जैवविविधतेचा जवळून अनुभव घेता येईल हे उपक्रम गोवा वन विभाग यांच्या सहकार्याने राबवले जात असून साहसी पर्यावरण पर्यटनालाही चालना दिली आहे. पावसाळ्यात महादई नदीमध्ये वेगवान पाण्यातील नौका नायनांचा साहसी खेळ सुरू करण्यात आला असून हा उपक्रम सतारी तालुक्यात राबविले जात आहे यामुळे गोवा अंतरिक भागातील पर्यटनालाही चालना मिळत आहे. तसेच अंजुनेम येथे आरोग्य आणि निसर्ग पर्यटन तसेच पर्यावरण पूरक निवासग्रह विकसित करण्याचा प्रकल्प चापोली धरण येथे जंगलातील विश्रांती पर्यटन प्रकल्प आणि कोटीगाओ महिला केंद्रित गाव विकास उपक्रम राबवले जात आहेत त्यामुळे निश्चितच गोवा पर्यटन विकासाला चालना व गती मिळणार आहे ही माहिती संकलित करण्यासाठी माझे गोव्यातील मित्र सुहास पारोडकर व गीता केरकर यांनी मोलाची माहिती दिली आहे त्यांचे अनुभव मनःपूर्वक आभार तसेच गोवा टुरिझम गाईडचे आभार.